# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**मु.मा.आ. नों.क्र.२२०४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. ७९८/२०१९**

**अपिलार्थी श्री. अरविंद चोहान**
द्वारा ४/१४ महावीर अपार्टमेंट, मंचुभाई रोड,
मालाड (पुर्व), मुंबई-४०००९७.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का) आर/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
संगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, बोरीवली (प), मुंबई-९२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता आर/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
संगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, बोरीवली (प), मुंबई-९२.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.१०.२०१९</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.११.२०१७ | - | ०५.०१.२०१८ | २२.०१.२०१८ |

अपिलार्थीने आयोगाकडे दि. १५.०५.२०१८ रोजी खालील कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे:-

"No Inspection and No Documents were given by concerned PIO- Mr. Pramod Waghmare even after visiting several times to the respected office (R/North Ward- Building and Factory Department) after the order passed of the First Appeal dated 22.01.2018."

अपिलार्थीने त्यांचा अर्ज दि. २७.११.२०१७ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

A. "Provide me the legal documents which supports and proves the structure authorized, named as, "KUMAR BEER SHOP, PATIL COMPOUND, NEAR KARIM SHEIKH COMPOUND, OPP. WAGHDEVI NAGAR, SANT MEERABAI ROAD, GHARTANPADA NO.2, DAHISAR EAST, MUMBAI- 400 068".

Information provided must support with legal documents.

B. Provide me the certified permission or NOC copies given from R/North Ward for authorized structure for opening a Beer Shop at, "KUMAR BEER SHOP, PATIL COMPOUND, NEAR KARIM SHEIKH COMPOUND, OPP. WAGHDEVI NAGAR, SANT MEERABAI ROAD, GHARTANPADA NO.2, DAHISAR EAST, MUMBAI- 400 068".

Information provided must support with legal documents."

C. Measurements (Length-Height-Breadth) of, "OM SAIKRUPA UDIPI VEG. RESTAURANT, SHOP NO. 2 and 3, JARIMARI COMPOUND, NEAR JARIMARI GARDEN AND DAHISAR PETROL PUMP, OPP. HOTEL SURAJ BAR AND RESTAURANT, C.S.ROAD, ANAND NAGAR, DAHISAR EAST, MUMBAI- 400 068".

Information provided must support with legal documents."

अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.०१.२०१८ संलग्न केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ०७ दिवसांत निशुल्क माहिती द्यावी असे आदेश दिले होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, आतापर्यंत त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, अपिलार्थी यांच्या अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर केलेली कारवाई बाबत कोणतीही कागदपत्रे कार्यालयात आढळली नाहीत.

वास्तविक तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यास्तव त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(१) चा भंग केला आहे. अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज दि. २७.११.२०१७ रोजी सादर केला असून माहिती पुरविण्यामध्ये १०० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागला आहेत. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरूध्द माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये. याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच अपिलार्थी यांना माहिती आवश्यक असल्याने, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य हाईल.

अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २७.११.२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती ३० दिवसांत नोंदीकृत टपालाव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, निशुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलार्थीना ३० दिवसांत पाठवावे.

३) अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक : १४.१०.२०१९

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

टिप: सदर आदेशाच्या सर्व पृष्ठांवर मा. आयुक्तांनी स्वाक्षरी केलेली आहे.

**प्रत पुढील कार्यवाहीस्तव:-**

तत्कालीन जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,संगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, बोरीवली (प), मुंबई-९२.
(मार्फत:- विद्यमान जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,संगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, बोरीवली (प), मुंबई-९२.)

## मु.मा.आ. नों.क्र.२२०४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. ७९८/२०१९

**अपिलार्थी श्री. अरविंद चौहान**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का) आर/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त,
आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय, मुंबई-९२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता आर/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त,
आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय, मुंबई-९२.

### खुलासा सुनावणी दिनांक : ०४.०१.२०२१
### (In continuation of order dtd १४.१०.२०१९)

| | | |
|---|---|---|
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

उक्त प्रकरणी आयोगाने दि. १४.१०.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले होते:

१) *"तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २७.११.२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.*

२) *विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती ३० दिवसांत नोंदीकृत टपालाव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, निशुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलार्थींना ३० दिवसांत पाठवावे.*

३) *अपील निकाली काढण्यात येत आहे."*

आयोगासमोर दि. ०७.१०.२०१९ रोजी झालेल्या सुनावणीअंती पारीत झालेल्या दि. १४.१०.२०१९ च्या आदेशानूसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. १ बाबत कोणताही खुलासा प्राप्त झालेला नाही. त्याअनुषंगाने आज दि. ०४.०१.२०२१ रोजी खुलासा सुनावणी आयोजित केली आहे.

सदर खुलासा सुनावणीसाठी श्री. डी.आय. फर्नांडिस, विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. रोहन निपूर्ते, विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. एस.एन. जाधव, प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

# मु.मा.आ. नों.क्र.२२०४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. ७९८/२०१९

सुनावणीच्या वेळी श्री. डी.आय.फर्नांडिस, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे निवेदन सादर केले:-

*"अपिलकर्ता श्री. अरविंद चौहान यांनी दि. २०.११.२०१७ व दि. २७.११.२०१७ रोजी माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्ज आर/उत्तर, इमारत व कारखाने विभागात केले होते. त्यावेळेसे तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) श्री. प्रमोद वाघमारे होते. सदर माहिती अर्जास माहिती न दिल्याने दि. २९.१२.२०१७ रोजी प्रथम अपील सादर केले होते. त्यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थी यांनी व्दितीय अपील सादर केले होते. सदर व्दितीय अपील सुनावणीत दि. १०.१०.२०१९ रोजी आदेशानुसार तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २०(१) अन्वये रु. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत आयोगाकडे सादर करावा असे आदेश दिले होते.*

*सदर आदेश कळविण्यासाठी श्री. प्रमोद वाघमारे, तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना वारंवार मोबाईलव्दारे संपर्क साधण्यात आला होता. परंतू त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद आला नाही. तसेच खुलासा सुनावणीसाठी लेखी खुलासा सादर करण्यासाठी व उपस्थित राहण्यासाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी श्री. संतोष जाधव यांनी दि. ०५.१२.२०२० रोजी मोबाईलवरती मेसेज केला होता. मेसेजचा screenshot ची प्रत सोबत जोडत आहे. परंतू श्री. प्रमोद वाघमारे यांनी कुठलाही प्रकारचा संपर्क साधला नाही.*

*कृपया आपल्या माहितीसाठी सविनय सादर."*

वरील सादर करण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट आहे की, तत्कालिन जन माहिती अधिकारी कोणताही प्रतिसाद देत नाही. तथापि, न्यायाच्या दृष्टीने त्यांना शेवटची एक संधी देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय अधिकारी (इ व का), आर/उत्तर विभाग यांनी आयोगाचे आदेश दि. १४.१०.२०१९ हे श्री. प्रमोद वाघमारे, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का), आर/उत्तर विभाग यांना ८ दिवसांत पोहोच करावे व श्री. प्रमोद वाघमारे यांना आदेश प्राप्त झालेबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

श्री. प्रमोद वाघमारे, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का), आर/उत्तर विभाग यांनी दि. १०.१०.२०१९ च्या आदेशातील परिच्छेद- १ बाबतचा खुलासा १५ दिवसांत आयोगासमोर सादर करावा. श्री. प्रमोद वाघमारे यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी पुढील आदेश देण्यात येतील.

State Information Commission, Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०४.०१.२०२१**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**